# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (प्र-कुलगुरु कार्यालय)

**डॉ. श्रीराम. एस.कावळे**
एम.ए.(अर्थशास्त्र), पीएच.डी..एम.कॉम. डी.बी.एम.
जी.डी.सी. अॅन्ड ए. ( प्र-कलगरू)

**एम.आय.डी.सी.रोडकॉम्पलेक्स गडचिरोली-४४२६०५(म.रा)**
**दुरध्वनी क्र.०७१३२-२२२२५७**
**ई.मेल- provc.gug@gmail.com**

जा.क्र. गोविग/प्र.कुल.का/१२७१/२०२६ दि. १२/०५/२०२६

## परिपत्रक

**विषय:- गोंडवाना विद्यापीठाव्दारे पर्यावरण दिनानिमीत्य आयोजित भव्य निबंध स्पर्धेमध्ये सहभागी होण्याबाबत.**

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयीन प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी, पाल्य व सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील चंद्रपूर व आजूबाजूच्या परिसरातील प्रदूषणामुळे आरोग्यावर परिणाम होत आहे. त्यामुळे गोंडवाना विद्यापीठाव्दारे चंद्रपूर व आजूबाजूच्या परिसरातील प्रदूषणावर नियंत्रण कसे करता येईल, याकरीता एक समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीव्दारे **"चंद्रपूर व परिसरातील प्रदूषण आणि नागरिकांची भूमिका"** या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धा ही खुली स्पर्धा असून यामध्ये मोठया संख्येनी सर्वांनी सहभाग घ्यावा अशी विद्यापीठ प्रशासनाव्दारे सर्व महाविद्यालयीन प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी, पाल्य व सर्व नागरिकांना विनंती करण्यात येत आहे.

सदर निबंध स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धकांचे निबंध/प्रवेशिका १००० शब्दमर्यादेत मराठी, हिंदी व इंग्रजी यापैकी कोणत्याही भाषेत स्विकारण्यात येतील. सदर स्पर्धेचे आयोजन इयत्ता १२ पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी व नागरिकांसाठी अशा दोन गटात करण्यात येत आहे. स्पर्धेचे पारितोषिक दोन्ही गटातील स्पर्धेकांसाठी देण्यात येणार असून प्रथम पारितोषिक ५०००/- रुपये, व्दितीय पारितोषिक ३०००/-रुपये, तृतीय पारितोषिक २०००/- रुपये आणि प्रोत्साहन पारितोषिक १०००/- रुपये तसेच स्पर्धेमध्ये सहभागी सर्व स्पर्धकांना विद्यापीठाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. या स्पर्धमध्ये सहभागी स्पर्धकांनी आपले निबंध/प्रवेशिका दिनांक २५ मे, २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत खाली दिलेल्या लिंकवर अपलोड करावे किंवा खालील केंद्रावर प्रत्यक्ष जावून जमा करावे.

**लिंक :-** https://forms.gle/yLAskaJKRbJL35C29

**केंद्राची नावे :-** १) जनता महाविद्यालय, चंद्रपूर

२) सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर
३) डॉ. खत्री महाविद्यालय, चंद्रपूर
४) दै. तरुण भारत कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालयासमोर, चंद्रपूर

आयोजित निबंध स्पर्धेचा निकाल जागतिक पर्यावरण दिनी दिनांक ५ जून, २०२६ रोजी घोषित करुन बक्षिस वितरीत करण्यात येईल. तरी विद्यापीठाशी संलग्नित सर्व प्राचार्य, प्राध्यापक व सर्वसंबंधितांनी या स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना व नागरिकांना सहभागी होण्याकरीता प्रोत्साहित करावे, ही विनंती.

डॉ. श्रीराम एस. कावळे
(प्र-कुलगुरु)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१) मा. कुलगुरुंचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२) मा. कुलसचिव कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.